**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**शुद्धीपत्रक क्रमांक २**

लोकसहभागातून शैक्षणिक सुविधा विकसित करणेसाठी आरक्षित भूखंड वितरित करणेकरिता विनंती प्रस्ताव अर्ज मागविण्यासाठीचे जाहिर प्रकटन या कार्यालयाची जाहिरात क्रमांक -१५५, सन २००९-२०१० अन्वये करण्यात आले होते. त्यानंतर जागेच्या क्षेत्रफळात व तपशिलात बदल झाल्याने सुधारित शुद्धीपत्र या जाहिराती अन्वये करण्यात येत आहे. त्यामुळे पूर्वी दिलेल्या मुदतीतही खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

**कोरे विनंती अर्ज वितरण व स्विकृती - दि. ३०/१२/२००९ (मुदतवाढ दिनांक) कार्यालयीन वेळेत**
**जागेचे क्षेत्र (अ.क्र.०१)** आकुर्डी माध्यमिक शाळा सि.स.नं. ४४८७ पैकी
१२१०८.९ चौ.मी. ऐवजी ६७५३ चौ. मी. वाचावे.
**(अ.क्र. ०२)** सांगवी PWD जागा (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान)
सर्व्हे न. ८३, ८४ - ५९०० चौ.मी. पैकी ३४०० मी शाळा व खेळाचे मैदान.

**सुधारित अटी व शर्ती**

| |
|---|
| **अट क्र. १)** मनपाने मनपा मालमत्ता या ९९ वर्षापर्यत भाड्यापट्टयाने देता येईल. त्याप्रमाणे ९९ वर्षाकरिताचाच भुईभाडे पट्टा करता येईल जागा मालकी मनपाचीच राहिल. |
| **अट क्र. २)** ९९ वर्षानंतर मुदतवाढ देणे अगर न देणे या संबंधीचे अधिकार मनपाने राखून ठेवले आहेत. |
| **अट क्र. ४)** देयकरारानुसार हप्ता पात्र संस्थेस स्विकृत भूखंड ताब्यात घेणेपुर्वी एक रक्कमी रक्कम भरावी . . लागेल. त्यानंतर भूखंडाचा ताबा मिळेल. |
| **अट क्र. ५)** आकुर्डी येथील आ.क्र. १३४ (जुना) व २७१ (नवीन) चे क्षेत्रात बदल झाला आहे. त्यामुळे ज्या अर्जदार संस्थेने जुने १२१०८.९ चौ. मि. क्षेत्र विचारात घेवून आपले देकार सादर केले आहेत त्यांना ६७५३ चौ. मि. इतके क्षेत्र विचारात घेवून नवीन देकार सादर करावेत. ज्या संस्थेचे सुधारित क्षेत्राचे देकार प्राप्त होतील तेच विचारात घेतले जातील. |
| **अट क्र. ६)** सांगवी येथील आ.क्र. ३३६ चे क्षेत्रात बदल झाला आहे. त्यामुळे ज्या अर्जदार संस्थेने जुने ५९०० चौ.मी. क्षेत्र विचारात घेवून आपले देकार सादर केले आहे. त्यांना ३४०० चौ. मी. इतके क्षेत्र विचारात घेवून नवीन देकार सादर करावेत. ज्या संस्थेचे सुधारीत क्षेत्राचे देकार प्राप्त.होतील तेच विचारात घेतले जातील. |
| **अट क्र. ७)** भूखंड जागा आरक्षण मोजणी करुन हद्दी महानगरपालिकेच्या सर्व्हेअर कडून निश्चित करुन दिल्या जातील. |
| **अट क्र. ८)** इमारत बांधकामाबाबत बँकेचे कर्ज घेतल्यास यासाठी आवश्यक असलेले नाहरकत प्रमाणपत्र देणेत येईल. |
| **अट क्र. ९)** सर्व कर/उपकर इ. भरणेची जबाबदारी ही संस्थेचीच राहील. |
| **अट क्र. १६)** सदर अट रद्द करण्यात येत आहे. |

**अतिरिक्त आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८.**

जावक क्र. माध्य/शि/३/कावि/८०५/२००९
दिनांक- २/१२/२००९
जाहिरात क्रमांक - १५५ चे शुध्दीपत्रक क्र.२

**शिक्षणाधिकारी**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८.**

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

## लोकसहभागातून शैक्षणिक सुविधा विकसीत करणेसाठी “आरक्षित भूखंड” वितरित करणेकरिता विनंती प्रस्ताव अर्ज मागविण्यासाठी जाहीर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विकास आराखडयामध्ये विविध ठिकाणी प्राथमिक/माध्यमिक शाळाकरीता जागा आरक्षित केलेल्या आहेत. मनपा विकास आराखडयातील खालील ठिकाणच्या शैक्षणिक आरक्षित जागा मराठी/इंग्रजी माध्यमाच्या नामांकित खाजगी शैक्षणिक संस्थाना खालील मनपा अटी शर्तीनुसार उपलब्ध करुन देणे अथवा संबधीत जागा आरक्षणाच्या अनुषंगाने विकसित करणेसाठी देणेसंबधी विचाराधीन आहे. त्यासाठी प्रतिसादात्मक बाब म्हणून खालील मनपा अटी/शर्तीनुसार वरील प्रकारातील इच्छुक मराठी/इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शैक्षणिक संस्था यांचेकडून लेखी अर्ज शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ मुख्य कार्यालय यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेत सादर करणेत यावेत. याबाबतची अधिक माहिती शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी यांचे कार्यालयात पहावयास मिळेल.

**आरक्षित भुखंडाचा तपशिल**

| अ.क्र. | आरक्षण | आरक्षित जागेचे ठिकाण गावाचे नाव | स. नं. सि. स. नं. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १. | जुना १३४ नवीन २७१ | आकुर्डी (माध्यमिक शाळा) | सि स.नं. ४४८७ पैकी | १२१०८.९ चौ. मी. |
| २. | ३३६ | सांगवी पी डब्ल्यू डी जागा (प्राथ. शाळा व खेळाचे मैदान) | स. नं. ८३, ८४ | ०.५९ आर |
| ३. | ३३९ | सांगवी ( प्राथ. शाळा) | स.नं. ७७ व ७८ पैकी | ७९९८.५२ चौ. मी. |

१. अर्जदार संस्था सोसायटी नोंदणी कायदा १९६० किंवा मुंबई सार्वजनिक संस्था नोंदणी कायदा १९५० नुसार नोंदणी झालेली असावी.
२. संस्थेचा मागील ५ वर्षाचा इ. १० वी चा सरासरी निकाल ९०% पेक्षा कमी नसावा. त्याबाबत पाच वर्षाचा अहवाल द्यावा लागेल.
३. संस्थेस प्राथमिक / माध्यमिक शैक्षणिक संस्था चालविणेस किमान १५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
४. संस्थेच्या किमान पाच शैक्षणिक शाखा असणे आवश्यक आहे.

- कोरे विनंती प्रस्ताव अर्ज वितरण - १४/०९/२००९ ते ३०/०९/२००९ कार्यालयीन वेळेत
- प्रस्ताव पूर्व बैठक, अटी शर्तीची माहिती - दि. २९/०९/२००९ सकाळी ११.०० वाजता
- विनंती प्रस्ताव उघडण्याचा दिनांक -०३/१०/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता

विनंती प्रस्ताव विक्री करण्याचे / सादर करण्याचे / उघडण्याचे दिवशी कोणत्याही कारणामुळे सार्वजनिक सुट्टी जाहिर झाल्यास, त्यानंतरचा कार्यालयीन कामकाजाचा दिवस हा प्रस्ताव विक्री / सादर करणेसाठी / उघडण्यासाठीचा अखेरचा दिनांक गृहित धरण्यात येईल. सदरची जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcIndia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८.**

माध्यमिक शिक्षण विभाग
जाहिरत क्रमांक - १५५
क्रमांक माध्य/शि/१अ/कावि/६६७/०९
दिनांक - १५/०९/२००९

सही/-
**शिक्षणाधिकारी**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८.**